मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र.११२२१/२०१६ संलग्न ८ याचिका या प्रकरणात शासनाची बाजू मांडण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या विशेष समुपदेशी यांना व्यावसायिक फी मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बालगृ-२०१६/प्र.क्र.३३४/का.८
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १२ जून, २०१९.

संदर्भ:- १. विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. १२२८-२०१६/ई-शाखा, दि.३१.१२.२०१६.
२. ॲड. श्री. पी. व्ही. मंडलिक, जेष्ठ वकील यांचे दि.३.५.२०१९ रोजीचे पत्र.

प्रस्तावना :-

महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. रिटपी-२०१५/प्र.क्र.४५/का-८, दि.१.१०.२०१६ अन्वये स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या बालगृहांना देण्यात आलेल्या अनुदानाबाबतच्या मुल्यनिर्धारण अहवालाचे पुनमुल्यनिर्धारण आणि तत्संबंधी कागदपत्रे तपासणीसाठी पथक गठित करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. हा शासन निर्णय रद्द करणेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. ११२२१/२०१६, मागास समाज सेवा मंडळ, देवताळा, ता. औसा, जि.लातूर वि. महाराष्ट्र शासन व इतर ८ याचिका दाखल झाल्या होत्या.सदर न्यायालयीन प्रकरणात शासनाच्या वतीने बाजू मांडण्यासाठी संदर्भाधीन पत्रान्वये विशेष समुपदेशी मंडळावरील, श्री. पी.व्ही.मंडलिक यांची नेमणूक करण्यात आली होती. ही न्यायालयीन प्रकरणे मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्या दि.०२.०३.२०१७ च्या आदेशान्वये निकाली काढण्यात आली आहे. सदर न्यायालयीन प्रकरणातील श्री. पी.व्ही.मंडलिक यांची व्यावसायिक फी अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. ११२२१/२०१६, मागास समाज सेवा मंडळ, देवताळा, ता. औसा, जि.लातूर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर ८ याचिकांमध्ये ॲड. श्री. पी. व्ही. मंडलिक, जेष्ठ वकील यांनी शासनाची बाजू मांडल्याप्रकरणी संदर्भाधीन क्र.२ अन्वये विनंती केल्यानुसार या शासन निर्णयान्वये ॲड. श्री. पी. व्ही. मंडलिक, जेष्ठ वकील यांना व्यावसायीक दराने ₹७,००,००० (अक्षरी रुपये सात लाख फक्त) इतकी फी खालील विवरणपत्रात दर्शविलेल्या बाबींकरिता अदा करण्यास मान्यता देण्यात आहे.

अ.क्र	तपशील	रक्कम (रुपये)
१	विचारविनिमय फी	₹२५,०००/-
२	शपथपत्र मसुदा तयार करण्याची फी	₹२५,०००/-
३	सुनावणी युक्तीवाद फी	₹६,५०,०००/-
एकूण		**₹७,००,०००/-**

२. या बाबीवर होणारा खर्च मागणी क्रमांक एक्स-२,२२५१-सेक्रेटरिएट-सामाजिक सेवा- ०९०-सचिवालय (०१) (०१) महिला व बाल विकास विभाग-(२२५१ ०४३६) या लेखा शिर्षांतर्गत २८-व्यावसायिक सेवा या उद्दीष्टाखाली सन २०१९-२०२० या अर्थसंकल्पीय वर्षासाठी अर्थसंकल्पीत तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-२०१५/प्र.क्र.२१/२०१५/विनियम,दिनांक २९ जुलै २०१५ चे परिशिष्ट-अ,वित्तीय अधिकार नियम पुस्तीका,१९७८,भाग-पहिला,उप विभाग-दोन,महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम-१९६५ मधील वित्तीय अधिकाराच्या मर्यादेमध्ये सुधारणा,भाग-पहिला, उप विभाग-दोन,अनु.क्र.४९ मधील नियम १६६-अ, अन्वये प्रशासकीय विभागप्रमुख यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१२१७४२५५०७३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women and Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, serialNumber=f9bd2a7c214922f8f4939e80711ece461c9dfd9c679b28f98e79475c5ea90e21, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2019.06.12 17:31:17 +05'30'

(स्मिता निवतकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवायोजना,नवी मुंबई
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई / नागपूर
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
५. कक्ष अधिकारी (रोखशाखा) महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय (मुळ बीलासह)
६. कक्ष अधिकारी(का.१),महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
७. ॲड. श्री.पी.व्ही.मंडलिक, शुभम करोती, प्लॉट नं.१०१, एन-३, सीडको, छत्रपती कॉलेज मागे, हाय कोर्टाजवळ, औरंगाबाद-४३१ ००३.
८. कक्ष अधिकारी,विधी व न्याय विभाग, (E शाखा) मंत्रालय,मुंबई
९. कक्ष अधिकारी,वित्त विभाग (व्यय-६), मंत्रालय,मुंबई
१०. निवड नस्ती/का-८.